




दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

● dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ Mo. 9822152955

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ●अंक २३८ ●गुरूवार, दि. ०५ डिसेंबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये







## मैं समंदर हूं, लौटकर आऊंगा.. मैं फिर आऊगा और मैं आज आ गया!

## आज के अभिमन्यु देवेंद्र फडणवीस ने तोड़ा चक्रव्यूह, दिया मुंह तोड़ जवाब!

# देवेंद्र फडवणीस आज मुख्यमंत्री पदाची शपथ घेणार



**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात पुन्हा एकदा देवेंद्र पर्व सुरु होणार आहे. २०१९ साली त्यांनी नारा दिला, 'मी पुन्हा येईन' त्यावेळी त्यांची खिल्ली उडवली. पण प्रचंड मेहनत, आत्म विश्वास आणि सगळ्यांना जिंकून तो पुन्हा येतोय. महाराष्ट्रासारख्या राज्यात पुन्हा मुख्यमंत्रीपद मिळवणं सोप नाहीय, पण कुठल्या पाच गुणांमुळे त्यांना हे शक्य झालं, त्याबद्दल....

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा देवेंद्र पर्व सुरु होणार आहे. देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्रीपदाचा मार्ग मोकळा झाला आहे. आज भाजपची गटनेता निवडीची बैठक झाली. यासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण आणि विजय रुपाणी केंद्रीय निरीक्षक म्हणून महाराष्ट्रात आले होते. भाजपच्या निवडून आलेल्या सर्व १३२ आमदारांनी एकमताने मुख्यमंत्रीपदासाठी देवेंद्र फडणवीस यांची निवड केली. देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्रीपदाचा मार्ग सोपा नव्हता. अनेक राजकीय अडथळे, आव्हान समोर होती. पण या सगळ्यावर मात करुन देवेंद्र फडणवीस आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. महत्त्वाच म्हणजे त्यांनी सर्वांना सोबत घेऊन हे यश मिळवलं. देवेंद्र फडणवीस यांनी २०१९ सालच्या विधानसभ निवडणुकीत 'मी पुन्हा येईन' अशी घोषणा केली होती. त्यावेळी या घोषणेवरुन त्यांना उलटं टार्गेट करण्यात आलं. पण आज या सगळ्या आव्हानांवर मात करुन ते पुन्हा आले आहेत.

## ●देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी पुन्हा येणं अजिबात सोप नव्हतं ते पुन्हा आले ते त्यांच्या अंगी असलेल्या या पाच गुणांमुळे

● देवेंद्र फडणवीस हे प्रचंड अभ्यासू नेते आहेत. त्यांचा मुख्यमंत्री पदापर्यंतचा प्रवास नगरसेवक पदापासून सुरु झाला. त्यांनी आधी नगरसेवक पदाची निवडणूक जिंकली. त्यानंतर नागपूरचे सर्वात तरुण महापौर बनले. त्यांचा अभ्यासू स्वभाव, विषय समजून घेण्याची हातोटी यामुळेच भाजपने त्यांना आमदारकीची संधी दिली. देवेंद्र फडणवीस यांचं महत्त्वाच कौशल्य म्हणजे मुद्देसूद मांडणी. कुठल्याही विषयाचा व्यवस्थित अभ्यास करुन मुद्देसूद मांडणी करुन ते बोलतात. त्यामुळे समोरच्यावर त्यांच्या बोलण्याची छाप उमटते.

● देवेंद्र फडणवीस यांचा आणखी एक गुण म्हणजे ट्रोलिंग सहन करण्याची क्षमता. त्यांच्यावर फक्त विरोधकच टीका करतात असं नाही, तर सोशल मीडियावर भाजप विरोधी त्यांच्यावर सतत शाब्दीक हल्ला चढवत असतात. त्यांना नको-नको ते बोलतात. पण देवेंद्र फडणवीस यांनी अन्य नेत्यांसारख त्यावरुन कधीही आरडाओरड, आदळआपट केली नाही. त्यांनी ज्या टीकेला उत्तर देणं गरजेच आहे, त्या टीकेलाच उत्तर दिलं. महत्त्वाच म्हणजे टीका होते, टेन्शन असतं, राजकीय आव्हान असतात. तरी ती चिंता त्यांच्या चेहऱ्यावर दिसत नाहीत.

● देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर अनेक आव्हान होती. पण त्या सगळ्यांना ते पुरुन उरले. २०२४ च्या निवडणुकीतील विजयानंतर मुख्यमंत्री पदावर त्यांचाच अधिकार आहे. कारण २०१४ साली ते पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले, त्यावर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना सत्तेत होती. पण बाहेर विरोधी पक्षाची भूमिका बजावायची. कारण काँग्रेस-राष्ट्रवादीपेक्षा त्यावेळी शिवसेनेने प्रखर विरोधी पक्षाची भूमिका बजावली. २०१९ च्या निकालानंतर शिवसेनेने त्यांच्या मनात काय होतं, ते दाखवून दिलं. त्यामुळे फडणवीसांना मुख्यमंत्री बनता आलं नाही. सहा महिन्यापूर्वी लोकसभा निवडणुकीत महायुतीचा महाराष्ट्रात दारुण पराभव झालेला. देवेंद्र फडणवीस यांनी चांगल्या टीम लीडरप्रमाणे जबाबदारी स्वीकारून पायउतार होण्याची तयारी सुद्धा दाखवली. पण पक्षाने त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवला. आज निकाल आपल्या सर्वांसमोर आहे.

● आज महाराष्ट्र भाजपमध्ये देवेंद्र फडणवीस यांचा बोलबोला आहे. त्यांच्या तोडीचा एकही नेता नाहीय. त्यांना एकवेळ स्पर्धक असणारे नेते एकनाथ खडसे, विनोद तावडे, पंकजा मुंडे आज शर्यतीत नाहीत. हे सुद्धा त्यांच्या राजकीय कौशल्याच यश आहे.

● इन्फ्रास्ट्रक्चर मॅन ही सुद्धा देवेंद्र फडणवीस यांची ओळख आहे. त्यांनी त्यांच्या साडेसात वर्षाच्या सत्ता काळात पायाभूत सोयी-सुविधाचे अनेक प्रकल्प मार्गी लावले. महत्त्वाच म्हणजे सुरु केलेले प्रकल्प त्यांच्या कार्यकाळातच पूर्ण झाले. उदहारणार्थ मेट्रो, कोस्टल रोड, अटल रोड. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांचा एक वेगळा चाहता वर्ग तयार झाला.

# शहरात चोरट्यांची टोळी सक्रिय

## चोरट्याची टोळीची सीसीटीव्हीत कैद, नागरिकात भीतीचे वातावरण

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरात मागील काही महिन्यापासून चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला होता.बीड शहर तसेच ग्रामीण भागात रोज कुठे ना कुठे चोरी झाल्याच्या किंवा चोरटे दिसल्याच्या घटना घडत होत्या. काही नागरिकांनी तर चोरांच्या भीतीने आपल्या भागात रात्रीची ग्रस्त सुरू केली होती. ग्रामीण भागात तर चोरटे ड्रोन ने टेहाळणी करत असल्याच्या अफवा पसरल्या होत्या,त्यामुळे बीड जिल्ह्यातील नागरिक भयभीत झाले होते. बीड शहरात दिनांक ३ डिसेंबर मंगळवार रोजी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास अंकुश नगर मधील भागात सहा चोरांचे टोळके फिरताना एक व्हिडिओ सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला असून या भागातील एका घरी कोणी नसल्याचे पाहून चोरटे एका घरासमोरील गेटचे लॉक तोडण्याचा प्रयत्न करत होते. घराबाहेर सीसीटीव्ही कॅमेरे असल्याचे चोरट्याच्या लक्षात आल्याने चोरट्यांचा चोरीचा प्रयत्न फसला व त्या घरापासून चोरट्यांनी पळ काढला. बीड शहरात पुन्हा चोरट्यांचे टोळके दिसल्याने अंकुश नगर भागातील नागरीकात भीतीचे वतावरन पसरले असून पोलिसांनी तात्काळ चोराचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिक करत आहेत.



*मुंबई येथे सागर निवासस्थानी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांची मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार साहेब यांनी सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा दिल्या व मतदार संघातील विकास कामासंदर्भात सविस्तर चर्चा करुन देवेंद्रजी फडवणीस साहेब यांच्या आदेशानुसार लोकहिताच्या व कार्यकर्ते ,सामान्य नागरिकांच्या प्रश्नावर ,पक्ष वाढीच्या कामाला लागा .*

# शाळेत जाणाऱ्या १५ वर्षीय मुलीवर ट्रेनमधून उतरून तिघांनी केला अत्याचार

**आष्टी । प्रतिनिधी**



वीट भट्टीवर दुसऱ्या जिल्ह्यातून आलेल्या मजुराच्या पंधरा वर्षीय मुलीवर रेल्वेतून उतरलेल्या तिघांनी लैंगिक अत्याचार घटना घडली. पीडिता नऊ महिन्याची गर्भवती असल्यानंतर ही बाब समोर आली. याप्रकरणी तिघांविरुद्ध सोमवारी आष्टी पोलिस ठाण्यात अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिंगोली जिल्ह्यातील एक कुटुंब मागील दोन वर्षांपूर्वी आष्टी तालुक्यातील एका गावात वीटभट्टीवर कामासाठी आले होते. याच कालावधीत मार्च २०२४ नक्की तारीख माहीत नाही.१५ वर्षीय अल्पवयीन मुलगी याच गावातील शाळेत रेल्वे पटरीच्या बाजूने जात असताना अनोळखी तिघे जण रेल्वेतून उतरले व यातील दोघांनी तिच्या हाताला धरून शेजारच्या शेतात नेले. यातील एकाने तिच्यावर बळजबरीने अत्याचार केल्याची घटना समोर आली. पीडिता यातून ९ महिन्यांची

# एकनाथ शिंदे मोठा निर्णय घेणार

## वाचाळवीर मंत्र्यांना नारळ देणार, शिवसेनेत घडामोडींना वेग

**मुंबई । प्रतिनिधी**



राज्यात लवकरच नव्या सरकारची स्थापना होणार आहे. त्यासाठी महायुतीकडून तयारी केली जात आहे. मुंबईतील आझाद मैदानावर नव्या सरकारचा शपथविधी पार पडणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची माळ यावेळी देवेंद्र फडणवीस यांच्याच गळ्यात पडण्याची शक्यता आहे. तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या पक्षाला काही महत्त्वाची मंत्रिपदे दिली जातील. आता मुख्यमंत्रिपदासाठीचं नाव जवळजवळ निश्चितच झाल्यामुळे आता नव्या सरकारमध्ये कोण-कोण मंत्री असणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागणार आहे. असे असतानाच आता शिवसेना पक्षात मंत्रिपदासाठी लॉबिंग चालू झाले आहे. सोबतच नाराजी टाळण्यासाठी मंत्र्यांपासून खात्यांबाबत गुप्तता पाळली जात आहे.

मंत्रिपद मिळावं यासाठी लॉबिंग- महायुतीमध्ये नव्या सरकारच्या स्थापनेला चांगलाच वेग आला आहे. महायुतीतील घटकपक्षांच्या वरिष्ठ नेत्यांच्या रोज बैठका होत आहेत. तर दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या पक्षातही मंत्रिपदासाठी अनेक नेते लॉबिंग करत आहेत. शपथविधीसाठी आता ३६ तासांचा कालावधी राहिला आहे. त्यामुळे शिवसेनेच्या गोटातही हालचाली वाढल्या आहेत. महत्त्वाचं खात आपल्या पदरात पडावं यासाठी शिवसेनेचे नेतेमंडळी प्रयत्न करत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार शिवसेना पक्षातील निवडक ज्येष्ठ मंत्र्यांना (५ नोव्हेंबर) मुंबईत राहण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे शिवसेनेच्या नेत्यांमधील नाराजी टाळता यावी यासाठी मंत्रिपदाबाबत गुप्तता पाळली जात आहे.

भ्रष्टाचाराचे आरोप असणाऱ्यांना मिळणार नारळ- मिळालेल्या माहितीनुसार शिवसेना पक्षातून सात आमदारांची मंत्रिपदी वर्णी लागणार आहे. त्यासाठी ज्येष्ठ मंत्र्यांना उद्या मुंबईत उपस्थित राहण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. ▶▶ उर्वरित पान २ वर

# भंडारा, गोंदिया, गडचिरोलीत भूकंपाचे धक्के, पहाटे पहाटे जमीन हादरली

**भंडारा । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील काही भागांमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहेत. त्यानुषंगाने राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्र यांच्याकडे उपलब्ध माहितीनुसार तेलंगणा राज्यातील मुलुगू हे भूकंपाचे केंद्र आहे. जिल्ह्यात आज सकाळी ०७.२७ वाजता हे भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार या भूकंपाची तीव्रता ५.३ किश्टर स्केल आहे.

सध्यातरी कोणतीही जीवितहानी नाही- मिळालेल्या ताज्या माहितीनुसार भंडारा जिल्ह्यात सध्याच्या अनुषंगाने कोणत्याच प्रकारचे नुकसान किंवा जीवितहानी झाल्याची झालेली आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी राष्ट्रीय भूकंप शास्त्र केंद्र यांच्या अधिकृत संकेतस्थळावर भेट देऊन माहिती घेता येईल, असे प्रशासनाने सांगितले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन- अशा प्रकारचे धक्के पुन्हा जाणवल्यास नागरिकांनी दक्षता घ्यावी व घाबरून न जाता इमारती बाहेर मोकळ्या जागेत सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संजय दैने यांनी केले आहे.

यावेळी भूकंपाची तीव्रता तुलनेने अधिक

मिळालेल्या माहितीनुसार महाराष्ट्राशी लागून असलेल्या तेलंगाणा या राज्यातील मुलुगू हा या भूकंपाचा केंद्रबिंदू आहे. महत्त्वाचे म्हणजे याआधीही याच भागात भूकंपाचे सौम्य धक्के बसले होते. यावेळी मात्र भूकंपाची तीव्रता अधिक होती. परिणामी या भूकंपाचे धक्के महाराष्ट्रातील काही सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये बसले. यात भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया या जिल्ह्यांचा समावेश आहे. काही इतर राज्यांच्या सीमेवरही हे भूकंपाचे धक्के बसले आहेत. सकाळी साडे सात वाजेच्या सुमारास हे घटना घडल्या आहेत.

ऑक्टोबर महिन्यात पालघरमध्ये भूकंप - पालघर जिल्ह्यातही अशाच प्रकारे भूकंपाचे धक्के जाणवले होते. डहाणू, तलासरी तालुक्यातील ▶▶ उर्वरित पान २ वर

# गुटखा माफिया मुळे आबाची हर्सुलमध्ये रवानगी

**बीड । प्रतिनिधी**

गुटखा माफिया असलेल्या महारूद्र उर्फ आबा मुळेला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी रात्री धाराशिवमधून अटक केली आहे. आबा मुळेवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली असून मुळेला हार्सुल कारागृहाकडे रवानगी करण्यात आल्याचे स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी सांगितले. बीड जिल्ह्यात गुटख्याची तस्करी आणि विक्रीसह गंभीर स्वरूपाचे गुन्हे आबा मुळेवर दाखल होते. काही दिवसांपूर्वी आबा मुळेला आंबडच्या बसस्थानकातून सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे यांनी अटक केली होती. त्याच्यावर मोठे गुन्हे दाखल

▶▶ उर्वरित पान २ वर

# महामानवाला द्यावी शालेय साहित्य दान देऊन मानवंदना

**बीड । प्रतिनिधी**

प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी वही-पेन दान करून अभिवादन करावे असे आवाहन महामानव अभिवादन ग्रुपने केले आहे.

गेल्या ३ वर्षापासून महामानव अभिवादन ग्रुप वही - पेन दानातून गरजू व होतकरू गोर - गरीब आणि आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही, पेन व रजिस्टर) वाटप करीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन ६-१२-२०२३ ते क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांचा स्मृतिदिन २८ नोव्हेंबर २०२४ पर्यंत १९ ठिकाणी कार्यक्रम राबवून १०६१ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले व विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करून मुलं,मुलींना शिक्षणाचे महत्त्व व सर्व थोर महापुरुषांच्या जीवनकार्याबद्दल माहिती दिली. तरी सर्व आंबेडकर प्रेमी दानदात्यांनी ६-१२-२०२४ च्या महापरिनिर्वाण दिन दानपारमितेचे पालन करून शालेय साहित्य व आर्थिक दान करावे, जेणेकरून वर्षभर गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले जाईल. असे नम्र आवाहन महामानव अभिवादन ग्रुप तर्फे करण्यात येत आहे.






# सत्र परीक्षा पद्धत (सेमिस्टर सिस्टिम) नकोच !



विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) २०१५ पासून 'चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टम' (सीबीसीएस)च्या अंमलबजावणीतून शैक्षणिक वर्षात, सत्र परीक्षा पद्धत (सेमिस्टर सिस्टिम) देशभरात सुरू केली. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० नुसार यापुढे सत्र पद्धती सुरूच राहणार आहे. यात शैक्षणिक वर्षाचे दोन किंवा अधिक सत्रांमध्ये विभाजन केले जाते. ही पद्धत भारतात तसेच इतर देशांमध्ये उच्च शिक्षण संस्थांमध्ये राबविली जाते. आज या पद्धतीचा सर्वत्र स्वीकार केल्यानंतर सत्र परीक्षा पद्धतीने खरोखरच भारतातील उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारत आहे का, की उच्च शिक्षणाची त्यामुळे अधोगती होत आहे, याची सर्वांगाने समीक्षा करणे अत्यावश्यक आहे.

यूजीसीच्या १८ जुलै २०१८ च्या अधिसूचनेत सत्र पद्धतीत वर्षाच्या कालावधी नियोजनाचे दिशानिर्देश करण्यात आले आहे. यात सहा दिवसांचा आठवडा असलेल्या महाविद्यालयात प्रत्येक सत्रात शिकवण्यासाठी ९० दिवस (तीन महिने), प्रवेश परीक्षा आणि परीक्षेचे नियोजन यासाठी ३५ दिवस (पाच आठवडे), उन्हाळी आणि हिवाळी सुट्ट्यांसाठी प्रत्येकी पाच आठवडे, सरकारी सुट्ट्यांसाठी एक आठवडा अशी विभागणी करण्यात आली आहे. कला, वाणिज्य आणि विज्ञान या शाखांमधून भारतात बीए, एमए, बीकॉम, एमकॉम, बीएस्सी आणि एमएस्सी, इत्यादी पदव्या दिल्या जातात. पारंपारिक पदवी अभ्यासक्रमांचा विचार करता, भारतीय समाज, भौगोलिक स्थिती, सामाजिक विविधता आणि लोकसंख्या यामुळे प्रत्यक्ष जमिनीवर 'सत्र परीक्षा पद्धती' पूर्णपणे अपयशी ठरल्याचे दिसते.

शिकवणे कमी आणि परीक्षा जास्त

सत्र परीक्षा पद्धतीमुळे महाविद्यालयांत शिकवणे कमी आणि परीक्षाच जास्त अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. यूजीसीच्या २०१८ च्या पत्रानुसार प्रत्येक सत्रात ९० दिवस (साधारणपणे तीन महिने) शिकवणे झालेच पाहिजे, असा अट्टहास आहे. ९० दिवसांचा कालावधी एक विषय शिकवण्यासाठी पुरेसा आहे का, हा चिंतनाचा आणि संशोधनाचा विषय आहे. तीन महिन्यांचा कालावधी विषयाच्या आकलनासाठी परिपूर्ण नसला तरी हा कालावधीदेखील नावालाच आहे. प्रत्येक सत्रात, प्रत्यक्षात महाविद्यालय पातळीवर शिकण्या आणि शिकवण्यासाठी ९० दिवसांपेक्षा कमी कालावधी मिळतो.

कारण राज्यातील महाविद्यालये विद्यापीठांशी संलग्न आहेत. विद्यापीठांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमात शिकवले जाणारे हजारो विषयांच्या परीक्षा आणि मूल्यमापन हे यूजीसीच्या दिलेल्या ३५ दिवसांच्या कालावधीत बसवणे कुठल्याही विद्यापीठाला निव्वळ अशक्य आहे. यात सीबीसीएस आणि पुन:परीक्षा किंवा रिपीटर विद्यार्थ्यांच्या परीक्षांचा विचार केल्यास परीक्षा कालावधी वाढतच जातो. हा कालावधी सत्राला ७५ ते ९० दिवसांपर्यंत (अडीच ते तीन महिन्यांपर्यंत) लांबत जातो. म्हणजेच एका वर्षाचा विचार केल्यास परीक्षा आणि मूल्यांकन यात सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी खर्च होतो. याचा परिपाक म्हणून शिकवण्यासाठी दिलेला तीन महिन्यांचा कालावधी आकुंचित होऊन दोन महिनेच शिल्लक राहतात. तत्त्वत: आधीच विषय शिकवण्यासाठी मिळालेला कमी कालावधी आणखी कमी होतो.

परीक्षेच्या कालावधीत महाविद्यालयातील अनेक वर्गखोल्या अडकून असतात. प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी परीक्षा प्रक्रियेमध्ये व्यग्र असतात. या काळात प्राध्यापक शिकवण्यासाठी उपलब्ध होत नाही. नियमित आणि नापास झालेले विद्यार्थी लांबलेल्या परीक्षेमध्ये गुंतलेले असतात. ते शिकण्यासाठी वर्गामध्ये हजर नसतात. परिणामी परीक्षा संपेपर्यंत, महाविद्यालयात शिकणे आणि शिकवण्याची महत्त्वाची प्रक्रिया थांबून राहते.

विद्यापीठाने संलग्न महिविद्यालायांच्या परीक्षांसाठी बसवलेले विस्तृत वेळापत्रक अर्ध्यावर आल्यावर दुसरे महत्त्वाचे काम सुरू होते, ते म्हणजे विद्यार्थ्यांच्या ''उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन''. परीक्षा झाल्यानंतर उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करणे आणि निकाल लावणे ही महत्त्वाची प्रक्रिया आहे. हजारो विषयांच्या परीक्षा घेऊन लाखो उत्तरपत्रिका तपासून वेळेत निकाल लावणे मिळालेल्या कालावधीत अशक्य आहे. यामुळे परीक्षेचा कालावधी वाढतो आणि अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी दिलेला कालावधी आणखी कमी होतो.

विद्यापीठांच्या अडचणी आणि खर्च

अनेक वर्षांपासून रखडलेल्या कर्मचारी भरतीमुळे मनुष्यबळाचा तुटवडा असलेली विद्यापीठे सत्र पद्धतीने अधिक अडचणीत सापडली आहेत. परीक्षा घेणे, उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करणे, निकाल लावणे हेच आता राज्यातील विद्यापीठांचे प्रमुख काम झाले आहे.

विषयांची संख्या दुप्पट झाल्याने त्यांचे अभ्यासक्रम तयार करणे एक मोठे संकट आणि वेळखाऊ काम झाले आहे. सततच्या परीक्षा, निकाल आणि मूल्यांकनात होणाऱ्या मानवी चुकांचे प्रमाण वाढलेले असून, त्यात भरडल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे.

अंतर्गत आणि बहिर्गत अशा चार परीक्षा, मूल्यांकन आणि अभ्यासक्रम तयार करणे यामुळे विद्यापीठांचा खर्च वाढला आहे. या वाढलेल्या खर्चाचा भार सरकारी अनुदाने कमी किंबहुना बंद झाल्याने शेवटी विद्यार्थ्यांवरच टाकला जातो. विद्यापीठांचा खर्चाचा डोलारा सांभाळण्यासाठी प्रशानसनाला प्रवेश आणि परीक्षा इत्यादींचे शुल्क वाढवावे लागते. वर्षातून दोनदा परीक्षा होत असल्याने विद्यार्थ्यांना दोनदा परीक्षा फी भरावी लागते. खर्च वाढून विद्यार्थी शिक्षणापासून दूर जात आहे. ही स्थिती महाराष्ट्रातील जवळपास सर्व विद्यापीठांमध्ये आहे. काही विद्यापीठे विविध दंड स्वरूपात विद्यार्थ्यांकडून 'वसुली' करून होणाऱ्या खर्चाचा ताळमेळ बसवण्यात तरबेज झाली आहेत. सरकारे आणि विद्यापीठांची शिक्षणातदेखील नफा आणि तोटा पाहण्याची वृत्ती कल्याणकारी राज्याला अशोभनीय आहे. सत्र पद्धतीमुळे विद्यार्थी फक्त परीक्षार्थी झाला आहे. महाविद्यालय आणि विद्यापीठ पातळीवर वर्षातून दोनदा अंतर्गत आणि सत्र परीक्षा घेतल्या जातात. विद्यार्थ्याची ऊर्जा विषयाच्या आकलनापेक्षा परीक्षा देण्यावरच जास्त खर्च होते. वास्तविक आकलनासाठी जास्त आणि मूल्यांकनासाठी कमी वेळ व ऊर्जा खर्च झाली पाहिजे. हे मूलभूत तत्त्व आपण विसरत आहोत.

संदर्भग्रंथ हद्दपार होऊन त्यांची जागा विविध प्रकाशकांच्या ३०-४० पानी 'टेक्स्ट बुक्स आणि नोट्स' यांनी घेतली आहे. ही साधने विद्यार्थ्यांची बौद्धिक भूक भागविण्यासाठी पुरेशी नाहीत. अशा साधनांच्या माध्यमातून अभ्यास करणारे विद्यार्थी हे आयुष्यभरासाठी बौद्धिकदृष्ट्या कुपोषित राहतात. ते स्वअध्ययनाच्या पातळीवर पोहोचत नाहीत. सत्र पद्धतीत विषय संख्येने जास्त आहेत, तरी वार्षिक परीक्षा पद्धतीच्या तुलनेत अभ्यासक्रम कमी झाला आहे. वार्षिक पद्धतीत शिकवली जाणारी साधारणत: नऊ प्रकरणे आता तीनवर आली आहेत. वेळेआभावी अभ्यास मंडळे तीन प्रकरणांची ओढून चार प्रकरणे करतात. इतक्या मर्यादित अभ्यासक्रमात अंतर्गत परीक्षा आणि सत्र परीक्षांसाठी पुनरावृत्ती टाळून प्रश्नपत्रिका तयार करणे कठीण होऊन बसते.

सध्याच्या 'रील'च्या काळात आधीच अस्थिर झालेला विद्यार्थी सत्र परीक्षा पद्धतीत अधिकच अस्थिर होत आहे. सततच्या परीक्षांमुळे त्याची ज्ञान ग्रहण करण्याची आणि आकलनक्षमता लोप पावत आहे. व्यक्तिमत्त्व विकासाचे अनेक उपक्रम मागे पडत आहेत. अशा उपक्रमांना विद्यार्थी मिळेनासे झाले आहेत.

वार्षिक परीक्षा पद्धती अधिक योग्य होती, असा सूर विद्यापीठांतील शिक्षकवर्गात उमटू लागला आहे. त्या पद्धतीत संख्येने कमी विषय अधिक विस्तृतपणे शिकवले जात. विद्यार्थी संदर्भग्रंथांचे वाचन करून विषयाचे सखोल ज्ञान संपादन करत. आकलनक्षमता वाढल्यावर 'शिक्षकाशिवाय' विषय अभ्यासण्यास विद्यार्थी मोकळा असे.

प्राध्यापकांच्या समस्या- परीक्षा आणि उत्तरपत्रिका मूल्यांकनाचा लांबलेला कालावधी एकीकडे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कालखंडाचा आणि दुसरीकडे प्राध्यापकांना मिळणाऱ्या सुट्ट्यांचा बळी घेतो. महाविद्यालयीन प्राध्यापकांना कुठल्याही हक्क रजा मिळत नाहीत. दूरवर राहत असलेल्या कुटुंबाच्या भेटीसाठी उन्हाळी आणि हिवाळी सुट्ट्या महत्त्वच्या असतात. दूर अंतरावरील आणि जिल्ह्यातील शिक्षकांना कुटुंबाच्या भेटीसाठी मोठी कसरत करावी लागते. त्यामुळे अनेक विद्यापीठांतील प्राध्यापक वेळोवेळी आंदोलन करतात.

प्राध्यापकांच्या अनेक जागा रिक्त आहेत. वारंवार अंतर्गत आणि विद्यापीठीय परीक्षा घेणे, उत्तरपत्रिका तपासणे आणि निकाल जाहीर करणे यामुळे व्यवस्थेवर मोठा ताण येतो. अभ्यासक्रम कर्मकांड केल्याप्रमाणे जलदगतीने उरकावा गतो. परिणामी शिक्षणातील गुणवत्ता कमी होते. प्राध्यापकवर्गदेखील संदर्भग्रंथांपासून दूर जाऊ लागला आहे.

महाग उच्च शिक्षणामुळे मोठ्या संख्येने गरीब विद्यार्थी उच्च शिक्षणाच्या परिघाबाहेर फेकले जात आहेत. साधारण आकलनक्षमता आणि शिकण्याचा स्वत:चाच एक वेग असणाऱ्या विद्यार्थ्यांना या पद्धतीत पूर्वीप्रमाणे सामावून घेतले जात नाही. या सर्व बाबी नवीन शिक्षण धोरणातील उच्च शिक्षणातील समता आणि समावेशकता या तत्त्वाला हरताळ फासणाऱ्या आहेत.

विद्यार्थ्यांतून 'प्रॉडक्ट' बनविण्याचा केविलवाणा आणि अयशस्वी प्रयत्न सरकारद्वारे केला जात आहे. नवीन शैक्षणिक धोरणात तातडीने या पद्धतीचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. सरकारने विद्यार्थी, प्राध्यापक आणि विद्यापीठे या घटकांशी विस्तृत चर्चा करून यातून मार्ग काढला पाहिजे. जेणेकरून शिक्षणासाठीच्या खर्चाचा बोजा कमी होईल. राज्यात बौद्धिकदृष्ट्या सुदृढ विद्यार्थी आणि नागरिक निर्माण करण्यासाठी हे अत्यावश्यक आहे.



*लोक पत्रकार प्रतिष्ठानच्या वतीने कु. पुनम अशोक टकले इयत्ता ६ वी वर्गात प्रथम आल्याबद्दल सत्कार करण्यात आला या प्रसंगी.*

## एपीआय गणेश मुंडे यांची गेवराई येथे बदली

**बीड । प्रतिनिधी**



जिल्ह्यात कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळख निर्माण करणारे एपीआय गणेश मुंडे यांची गेवराई येथे महामार्ग पोलीस विभागात बदली करण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसापूर्वीच एपीआय गणेश मुंडे यांची नळदुर्ग येथे बदली करण्यात आली होती. मुंडे यांनी स्थानिक गुन्हे शाखेसह पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकात उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या धडाकेबाज कामगिरीमुळे अवैध धंद्ये करणाऱ्यांचे धाबे दणाणत असत. ३ डिसेंबर रोजी त्यांची नळदुर्ग येथून गेवराई येथील महामार्ग पोलीस विभागात बदली करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक (मुख्यालय) अरविंद साळवे, अप्पर पोलीस महासंचालक वाहतूक मुंबई यांनी हे आदेश काढले आहेत.

## द. बा. घुमरे स्कूलच्या तनुजा हाडुळे हिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**पाटोदा । प्रतिनिधी**

द.बा. घुमरे पब्लिक स्कूल बीड च्या तनुजा हाडुळे या विद्यार्थिनीची राष्ट्रीय नेट बॉल स्पर्धेसाठी निवड झाली असून तनुजा हि राज्य स्तरीय स्पर्धेत नागपूर येथे खेळली असून तिची राष्ट्रीय खेळाडू म्हणून निवड झाल्या बद्दल विविध स्तरातून अभिनंदन होत आहे तमिळनाडू येथे २८ ते ३० डिसेम्बर पर्यंत मॅच चालणार असून भंडारा या ठिकाणी ५ दिवस कॅम्प होणार असून तेथुन तामिळनाडू साठी टीम रवाना होणार आहे. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक



सचिव दिपक घुमरे, प्राचार्य एम आर शेंडगे, क्रीडा प्रशिक्षक गिरी विशाल तसेच जिल्हा असोसिएशन नेट बॉल चे चेअरमन रामदास गिरी तसेच शाळेतील शिक्षक वृन्द अशोक सानप, देवढे, संभाजी पवार, गाऊ अडागळे, आर जे इंगोले जाधव सर, हावळे सर, गव्हाणे सर, जगताप सर डावकर सर, शिंगटे सर यांनी अभिनंदन केले आहे व पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या...

पान १/४ वरून पुढे.....

## शाळेत जाणाऱ्या...

गर्भवती असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. याप्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरून २ डिसेंबर रोजी अनोळखी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आष्टीचे उपअधीक्षक बाळकृष्ण हानपुडे, पोलिस निरीक्षक शरद भुतेकर, सहायक पोलिस निरीक्षक विक्रांत हिंगे याच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे करीत आहेत.

## एकनाथ शिंदे...

यावेळी एकनाथ शिंदे काही मोठे निर्णय घेण्याची शक्यता आहे. याआधीच्या सरकारमध्ये ज्या नेत्यांना मंत्रिपद दिलं होतं, अशा तीन नेत्यांना यावेळी मंत्रिपद दिलं जाणार आहे. म्हणजेच मंत्री राहिलेल्या तीन बड्या नेत्यांचा पत्ता कट होणार आहे. त्याऐवजी नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाणार आहे. अकार्यक्षम, भ्रष्टाचाराचे आरोप आणि वाचाळवीर मंत्र्यांना एकनाथ शिंदे नारळ देण्याची शक्यता आहे.

### १५०० पोलिसांचा बंदोबस्त

दरम्यान, मुंबईच्या आझाद मैदानावर शपथविधीसाठी जोरदार तयारी केली जात आहे. येथे महायूतीच्या शपतविधीसाठी मुंबई पोलिसांकडून चोख पोलीस बंदोबस्त राहणार आहे. शपथविधी सोहळ्यादरम्यान होणारी गर्दी लक्षात घेता मुंबई पोलिसांकडून अडीच हजारहून अधिक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शपथविधीदरम्यान १० पोलीस उपायुक्त, २० सहाय्यक पोलीस आयुक्त, १०० पोलीस निरीक्षक, १५० सहाय्यक व पोलीस उपनिरीक्षकांसह १५०० हून अधिक पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी उपस्थित राहणार आहेत.

राज्यात लवकरच नव्या सरकारची स्थापना होणार आहे. त्यासाठी महायुतीकडून तयारी केली जात आहे. मुंबईतील आझाद मैदानावर नव्या सरकारचा शपथविधी पार पडणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची माळ यावेळी देवेंद्र फडणवीस यांच्याच गळ्यात पडण्याची शक्यता आहे. तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या पक्षाला काही महत्त्वाची मंत्रिपदे दिली जातील. आता मुख्यमंत्रिपदासाठीचं नाव जवळजवळ निश्चितच झाल्यामुळे आता नव्या सरकारमध्ये कोण-कोण मंत्री असणार ? याकडे सर्वांचेच लक्ष लागणार आहे. असे असतानाच आता शिवसेना पक्षात मंत्रिपदासाठी लॉबिंग चालू झाले आहे. सोबतच नाराजी टाळण्यासाठी मंत्र्यांपासून खात्यांबाबत गुप्तता पाळली जात आहे.

### मंत्रिपद मिळावं यासाठी लॉबिंग

महायुतीमध्ये नव्या सरकारच्या स्थापनेला चांगलाच वेग आला आहे. महायुतीतील घटकपक्षांच्या वरिष्ठ नेत्यांच्या रोज बैठका होत आहेत. तर दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या पक्षातही मंत्रिपदासाठी अनेक नेते लॉबिंग करत आहेत. शपथविधीसाठी आता ३६ तासांचा कालावधी राहिला आहे. त्यामुळे शिवसेनेच्या गोटातही हालचाली वाढल्या आहेत. महत्त्वाचं खात आपल्या पदरात पडावं यासाठी शिवसेनेचे नेतेमंडळी प्रयत्न करत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार शिवसेना पक्षातील निवडक ज्येष्ठ मंत्र्यांना उद्या (५ नोव्हेंबर) मुंबईत राहण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे शिवसेनेच्या नेत्यांमधील नाराजी टाळता यावी यासाठी मंत्रिपदाबाबत गुप्तता पाळली जात आहे.

### भ्रष्टाचाराचे आरोप असणाऱ्यांना मिळणार नारळ

मिळालेल्या माहितीनुसार शिवसेना पक्षातून सात आमदारांची मंत्रिपदी वर्णी लागणार आहे. त्यासाठी ज्येष्ठ मंत्र्यांना उद्या मुंबईत उपस्थित राहण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. यावेळी एकनाथ शिंदे काही मोठे निर्णय घेण्याची शक्यता आहे. याआधीच्या सरकारमध्ये ज्या नेत्यांना मंत्रिपद दिलं होतं, अशा तीन नेत्यांना यावेळी मंत्रिपद दिलं जाणार आहे. म्हणजेच मंत्री राहिलेल्या तीन बड्या नेत्यांचा पत्ता कट होणार आहे. त्याऐवजी नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाणार आहे. अकार्यक्षम, भ्रष्टाचाराचे आरोप आणि वाचाळवीर मंत्र्यांना एकनाथ शिंदे नारळ देण्याची शक्यता आहे.

### १५०० पोलिसांचा बंदोबस्त

दरम्यान, मुंबईच्या आझाद मैदानावर शपथविधीसाठी जोरदार तयारी केली जात आहे. येथे महायूतीच्या शपतविधीसाठी मुंबई पोलिसांकडून चोख पोलीस बंदोबस्त राहणार आहे. शपथविधी सोहळ्यादरम्यान होणारी गर्दी लक्षात घेता मुंबई पोलिसांकडून अडीच हजारहून अधिक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शपथविधीदरम्यान १० पोलीस उपायुक्त, २० सहाय्यक पोलीस आयुक्त, १०० पोलीस निरीक्षक, १५० सहाय्यक व पोलीस उपनिरीक्षकांसह १५०० हून अधिक पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी उपस्थित राहणार आहेत.

## भंडारा, गोंदिया, गडचिरोलीत...

गावांना भूकंपाचा धक्का बसल्याने पुन्हा एकदा दोन्ही तालुक्यातील गावे होती. तलासरी-डहाणू तालुक्यातील काही गावांना १५ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजून ४७ मिनिटाला ३.५ रिश्टर स्केलचा भूकंपाचा धक्का बसला होता. त्याचा केंद्रबिंदू जमिनीखाली ५ किलोमीटर खोल, डहाणू तालुक्यातील कंक्राटीजवळ होता. मागील २०१८ पासून पालघर (झरश्रसहरी) जिल्ह्यातील डहाणू, तलासरी तालुक्यातील गावांना भूकंपाचे धक्के बसत आहेत. गेल्या काही महिन्यांपासून भूकंप थांबले होते. मात्र अशा प्रकारे भूकंपाचे धक्के बसल्यामुळे तेव्हा नागरिकांत भीती पसरली होती.

## गुटखा माफिया...

असल्याने एमपीएडीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला होता. अखेर त्याला मंजूरी मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने आरोपीला धाराशिवमधून काही वेळापूर्वी अटक केल्याचे कळते. स्थानिक गुन्हे शाखेतील विघ्ने यांच्या पथकाने ही कारवाई केल्याची माहिती असून आरोपीला हार्सुल कारागृहाकडे घेवून जात असल्याचे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी प्रजापत्रशी बोलताना सांगितले आहे.

## महाराष्ट्र राज्याच्या...

झाल्याची बातमी दूरदर्शन झळकली आणि भा ज.पा.चे आ.सुरेश धस यांच्या समर्थकांनी आष्टीत आनंदोत्सव साजरा केला. महाराष्ट्राच्या हितासाठी नेहमी तत्पर असलेले महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी नेतृत्व मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी महायुतीचे मुख्यमंत्री शिवसेनेचे एकनाथजी शिंदे राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्यमंत्री अजित पवार आणि मित्र पक्षांना बरोबर घेऊन विधानसभा निवडणुकीमध्ये अभूतपूर्व ऐतिहासिक यश मिळवले भारतीय जनता पक्ष विधिमंडळ गटनेतेपदी निवड झाल्याबद्दल भारतीय जनता पार्टी व आमदार सुरेश धस मित्र मंडळाच्यावतीने घोषणाबाजी तोफा वाजवत स्वागत केले आनंदोत्सव साजरा करत बाहुबली देवाभाऊ यांना मुख्यमंत्री पदाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे,गणेश शिंदे, संदीप खकाळ,गटनेते किशोर दरेकर, नगरसेवक शरीफ शेख,अरुण निकाळजे, विनोद रोडे, दीपक निकाळजे,संतोष मुरकुटे मनोज सुरवसे, इर्शान खान,रघुनाथ आवारे,जालिंदर पोकळे,संजय मुळे,नितीन आवारे,ज्ञानेश्वर राऊत,संभाजी भांगे,प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्याच्या जमिनीवर...

दिल्यावर शेतात मोजणी कारण्यासाठी दि.०२/१२/२०२४ रोजी शेतात आल्यावर मोजणी चालू असताना सदरील जागेवर गुत्तेदार धनराज मुंडे येऊन मोजणी करू दिली नाही व अधिकाऱ्यांला दम देत जर मोजणी केली तर एका एकाला जीवे मारीन असे धमकी दिल्याचे आरोपही या निवेदनात केले आहे. तरी शेतात बेकायदेशीर केलेलं ताबा हटवून,आमच्या शेतीमधील झालेल्या पिकाचे नुकसान सदरील कंपनीकडून भरून द्यावे अन्यथा दि. ०५/१२/२०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा संबंधित शेतकऱ्याने निवेदनाद्वारे देण्यात आलं आहे.

## मत्री पदाचा अनुभव...

त्यांच्याकडे आहे.मंत्री पदाचा अनुभवही त्यांच्याकडे आहे त्यामुळे आ.प्रकाशदादा सोळंके यांना मंत्रिमंडळात समावेश करण्याची मागणी संतोष रासवे यानी केली आहे.

## विकासकामांच्या वचनपूर्तीसाठी...

आहे. आपण मंदिर, सभागृह व परिसर विकासाकरिता निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. हे काम अंतिम टप्यात असून मंदिराच्या संरक्षण भिंतीच्या बांधकामासाठी आता २० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या मंदिराचे काम पूर्णत्वास जात असून लवकरच प्राणप्रतिष्ठापणा सोहळा आयोजित केला जाणार आहे. या धार्मिक कार्यात आपला खारीचा वाटा असल्याचे मनाला समाधान वाटते, असेही डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, समाजातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विलासअप्पा लांडगे...

स्वामीजी यांची प्रमुख उपस्थिती होती. माजलगाव येथील सद्गुरू श्री मिस्कीनस्वामी मठ संस्थानचे पूर्वाचार्य लिं. श्रीगुरू तपोरत्नं प्रभुपंडिताराध्य शिवाचार्य स्वामीजींचे विश्वासू शिष्य माजलगाव येथील विलासअप्पा लांडगे यांचा धार्मिक क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरी बद्दल तर छत्रपती संभाजीनगर येथील देवीदासअप्पा उंचे यांचा वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनिय कागगिरी बद्दल यावेळी वीरशैवरत्न पुरस्कार प्रदान करून सन्मान करण्यात आला. त्या सोबतच वीरशैव समाजातील विविध क्षेत्रात आपल्या कार्याची छाप सोडणार्या सर्वश्री संतुकराव शिवणकर, राजेंद्र मुंडे, महेश स्वामी, दत्ताप्पा कसबकर, गुरूनाथ बेंडूरे, नारायण गौंडर, नारायण गौरकर, शिवानंद कथले, शिवशंकर भुरे, महादेव लामतुरे, ओंकार पंचाक्षरी, नागेश मिटकरी, जयश्री भुसारे, नारायण पळसे, प्रा.ओमप्रकाश झुरूळे, संजय हत्ते, भिमाशंकर बेंबळकर, नाररायण हसेगावकर, पृथा पंडित, दीपक उरगुंडे, प्रविण उमराणे, नागनाथ स्वामी काजळे, जगदिश बुरांडे या मान्यवरांनाही वीरशैवरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा समारोह यशस्वी करण्यासाठी सोनपेठ येथील श्री नंदीकेश्वर मठ संस्थानच्या शिष्य परिवाराने विशेष परिश्रम घेतले.

## बीडच्या तरूणाईत ...

महोत्सव यशस्वीतेसाठी तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, कालिदास होसुरकर, रेवननाथ शेलार, सतीश राठोड, अविनाशा पाटील, कार्यालय अधीक्षक धनेश करांडे, त्रिगुणा वाघमोडे, क्रीडा संयोजक जितेंद आराक, सचिन जाधव , किशोर काळे , मंगेश वडमारे, राजेश बागलाने आदी पुढाकार घेत आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मराठा आरक्षण योद्धा तानाजी सावंत यांना कॅबिनेट मंत्रीपद द्यावे

## जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाचे खरे योद्धा आमदार तानाजी सावंत यांना महायुती सरकारमध्ये मुख्यमंत्र्यांनी ग्रामविकास अथवा महसूल खात्याचे कॅबिनेट मंत्री करून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी द्यावी. त्यांना सदरील खाते देऊन महाराष्ट्रातील तमाम मराठा समाजाला न्याय द्यावा अशी जाहीर मागणी जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांनी केली आहे.



काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या शिवसेनेचे धाराशिव जिल्ह्यातील भूम परांडा मतदार संघाचे तरुण तडफदार आमदार तानाजी सावंत हे मराठा समाजाचे खरे शिलेदार आहेत. लोकनेते स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्या समवेत मराठा आरक्षणासाठी ते मेटे साहेबाप्रमाणे उघड पणे भूमिका घेऊन मराठा समाजासाठी सत्तेत असताना सुद्धा सत्ताधाऱ्यांना धारेवर धरत होते. गरजवंत मराठ्यांना ओबीसी मधून आरक्षण मिळाले पाहिजे ही त्यांची प्रमुख भूमिका होती आणि ठामपणे आहे. आपल्या भूमिकेसोबत ते कधीही परिस्थितीनुसार प्रसंगानुसार स्वतःच्या स्वार्थासाठी बदलणारे नेतृत्व नाहीत. मराठा समाजाच्या पाठीशी कायम उघड भूमिका घेऊन ठाम पाठीशी राहणारे महाराष्ट्रातील एकमेव विधिमंडळातील नेतृत्व म्हणजेच तानाजी सावंत आहेत.तानाजी सावंत यांनी इतर कोणत्याही समाजावर अन्याय केला नाही. सर्व समाजाला न्याय देणारे आणि मराठा समाजासाठी उघडपणे भूमिका घेणारे नेतृत्व आहे. एवढेच नव्हे मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी महाराष्ट्रात अनेकांनी निराश होऊन आत्महत्या केल्या. त्या आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना तानाजी सावंत यांनी कुटुंबप्रमुख प्रमाणे मायेची सावली त्या कुटुंबीयाच्या पाठीशी उभी केली. आत्महत्याग्रस्त कुटुंब या दुःखातून बाहेर पडावे यासाठी सरकारच्या तिजोरीतून जी काही मदत जास्तीत जास्त करता येईल त्यासाठी तर प्रयत्न केलेच याशिवाय स्वतः व्यक्तिगत महाराष्ट्रातील ज्या तरुणांनी मराठा आरक्षण समर्थकांनी मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केल्या अशा कुटुंबीयांपैकी ३७ कुटुंबीयांना त्यांनी स्वतः व्यक्तिगत प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत दिली. असे दायित्व आणि दातृत्व असलेल्या नेतृत्व महाराष्ट्रात एकमेव आमदार तानाजी सावंत आहेत यात शंका नाही. त्यामुळेच जय शिवसंग्रामने त्यांना विधानसभा निवडणुकीत जाहीर पाठिंबा देऊन त्यांना निवडून आणण्यामध्ये प्रमुख भूमिका घेत प्रचाराची धुरा जय शिवसंग्रामने सांभाळली होती. महाराष्ट्रामध्ये महायुतीचे सरकार आणि काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या शिवसेनेचे सर्वाधिक आमदार निवडून यावेत यासाठी त्यांनी इतर मतदारसंघात सुद्धा जाऊन स्टार प्रचारक प्रमाणे भूमिका बजावली. ते उत्कृष्ट संघटक असून समाजबांधणी करण्यामध्ये त्यांचा मोठा हातकंठा आहे. त्यामुळे अशा नेतृत्वाला महायुतीच्या सरकारमध्ये कॅबिनेटमध्ये सर्व समाज घटकांचे कल्याण करण्यासारखे ग्रामविकास खाते किंवा महसूल खाते त्यांच्याकडे देऊन या महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी अशा लोकप्रिय कणखर नेतृत्वाला संधी द्यावी अशी जाहीर मागणी जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांनी केली आहे.

---

## महत्वाचे

### पीएम कुसुम सौर ऊर्जा पंप देण्यासाठी टाळाटाळ

**गेवराई । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांसाठी पीएम कुसुम सौर ऊर्जा पंप योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेसाठी लाभार्थ्यांची निवड केली जात असते. मात्र बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात निवडण्यात आलेले लाभार्थी कोरडे बन्सी मारोती यांना सोलर पंप मिळाला नसून त्यांचा पंप देण्यास जिल्हा व्यवस्थापक महाऊर्जा कार्यालयाकडून टाळाटाळ केली जात आहे. कुसुम योजनेअंतर्गत सोलार योजनेचा फॉर्म भरला होता मात्र मार्च ३क्ष पंपासाठी २२७९१भरना करुन मागणी झत ुिशी या कंपनीची निवड करण्यात आली होती महावितरण कंपनीच्या संबंधित कर्मचाऱ्यांनी सर्वे केला होता सर्व प्रक्रिया होऊन सुद्धा या कंपनीकडून कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद मिळत नाही पंप देण्यासाठी लाभार्थ्यांची टाळाटाळ केली जात असून यावर वरिष्ठ अधिकाऱ्याने लक्ष घालून तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी होत आहे.

### कृष्णा जोशी यांना ज्योतिष शास्त्री पदवी

**महाराष्ट्र जोतिष परिषदेत नाशिकमध्ये झाला सन्मान**



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील पात्रुड येथील कृष्णा कल्याण जोशी यांना महाराष्ट्र जोतिष परिषदेच्या वतीने ज्योतिष शास्त्री पदवीने नाशिक येथे त्यांचा सन्मान करण्यात आला. कृष्णा जोशी यांचे शिक्षण शुक्ल यजुर्वेद कण्व शाखा व अथर्ववेद शौनक शाखा, ऋग्वेद मंत्र संहिता तसेच ज्योतिष शास्त्रात पारंपारिक वैदिक ज्योतिष, रत्नशास्त्र, अंकशास्त्र, रमलविद्या ताजिक पध्दती, मेदनीय ज्योतिष प्रश्नशास्त्र,ज्योतिष गणित, ज्योतिष फलादेश, ज्योतिष परिचय निबंधलेखन आदी अभ्यासक्रम पुर्ण करून त्या विषयांच्या असलेल्या कठीण परिक्षेत उत्तीर्ण झाल्याने महाराष्ट्र जोतिष परिषद मुंबई यांच्या वतीने ता. १ डिसेंबरला नाशिक येथे ३६ व्या दिक्षांत समारंभात ज्योतिष शास्त्री या पदवीने कृष्णा जोशी यांना अर्थतज्ञ डॉ. विनायक गोविलकर, प्रा. गोविन्द पाण्डेय, परिषदेचे अध्यक्ष अनिल चांदवडकर, स्वागतोत्सुक संदीप जोशी, अरूण चव्हाण यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कृष्णा जोशी यांच्या यशाबद्दल माजी सरपंच एकनाथ शिंदे, घनश्याम भुतडा, सरपंच लतिफ मोमीन, भानुदास भुजबळ, सत्यप्रेम नाटकर, बाळासाहेब बनकर, डॉ. प्रकाश शिंदे, नवनाथ चाळक, अनिल आवाड, संतोष घुबडे, बाळासाहेब शिंदे यांचेसह त्यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

---

# जनाई ते संत जनाबाई पुस्तकाचा प्रकाशन सोहळा संपन्न

**जालना । प्रतिनिधी**

जालना समाजकार्य महाविद्यालय रामनगर, जालना येथे जनाई ते संत जनाबाई या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. प्रा. डॉ. रेणुका भावसार व डॉ. नरसिंग पवार यांच्या प्रयत्नातून या ग्रंथाची निर्मिती झाली आहे. संत जनाबाई विषयी अतिशय त्रोटक माहिती उपलब्ध असल्यामुळे याविषयी संदर्भग्रंथ तयार करण्याची कल्पना सुचली.



संत जनाबाई या एक उपेक्षित स्त्री म्हणून जीवन जगल्या. तत्कालीन समजव्यवस्थेमध्ये त्यांना स्वतंत्र स्थान मिळाले नाही, पुरुषप्रधान समजव्यवस्थेमध्ये जनाई सुद्धा भरडली गेली. परंतु तरीही स्वसामर्थ्यावर जनाई संत पदापर्यन्त जाऊन पोहचली, व संत जनाबाई म्हणून जगासमोर प्रसिद्ध झाली. आई, बापाविना जनी दामाघरी मनापासूनच दासी म्हणून राहिली. आपले अवघे आयुष्य दामाशेट्टीच्या कुटुंबाच्या सेवेत अर्पण करणारी जनाई, अतिशय कष्टाळू होती. तिने विठ्ठल भक्तिमध्ये लीन होऊन स्वतःला विठ्ठलास समर्पित करून टाकले होते. विठ्ठलासच आपले माता पिता मानून सर्व दुःख सांगत होती. प्रत्येक काम करताना जनाई विठ्ठलाला स्मरत, विठ्ठल भक्तीमध्ये लीन होऊन सर्व कामे करत असे. विठ्ठलाचें स्मरण करतच संत जनाबाईने असंख्य ओव्या, अभंग, कथा, भक्तीसार यांचे दालन समाजासा उपलब्ध करून दिले. आपल्यावर कितीही मोठे संकट असले , प्रतिकूल परिस्थिती असली तरीही आपण आपल्याला हव्या त्या ध्येयापर्यंत पोहचू शकतो, हे जनाईने तिच्या कर्तृत्वामधून सिद्ध केले. संत जनाईला विविध पुस्तके, ग्रंथरूपात टिपने, अभ्यासणे अतिशय आनंददायी वाटत होते. संपूर्ण महाराष्ट्रातून प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांनी यासाठी लेख पाठवून सहकार्य केले. आणि ग्रंथ सुंदर तयार झाला.. जालना समाजकार्य महाविद्यालय रामनगर जालना येथे संत जनाबाईच्या संदर्भ ग्रंथाचा प्रकाशन सोहळा पार पडला. या सोहळ्यासाठी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के, प्रशासकीय अधिकारी श्री रमेश गजर, श्री विकास लाखे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महाविद्यालयातील प्रा. डॉ. रेणुका बडवणे, डॉ नरसिंग पवार, डॉ. सुधीर गायकवाड, डॉ, मधू खोब्रागडे, डॉ. दीपक बुक्तरे, डॉ. मीना बोर्डे, डॉ. बालाजी मुंडे, श्री बिभीषण शेजूळ, शिवाजी भुतेकर, संजय गाडे, योगेश पवार, अनिल हजारे, किशोर ढेकळे, अंजीराम जाधव इत्यादी उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. रेणुका भावसार व डॉ. नरसिंग पवार यांनी संत जनाबाई यांच्या संदर्भ ग्रंथाविषयीं आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्यांनी संत जनाबाईविषयी आपले विचार प्रकट केले. अंजीराम जाधव यांनी आभार मानले.

---

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील राहुल दिलीप सिरसट याची अर्थ व सांख्यिकी विभागामध्ये सहायक पदी निवड

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील माझी विद्यार्थी श्री.राहुल दिलीप सिरसट याची अर्थ व सांख्यिकी विभागामध्ये सहायक पदावर निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते स्वागत व सत्कार करण्यात आले. राहुल याने राजमाता जिजाऊ महाविद्यालयातून बीकॉमचे शिक्षण पूर्ण केले आहे. त्याने मिळविलेल्या यशाबद्दल प्राचार्यांनी कौतुक व अभिनंदन करून भावी वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, प्रभारी कार्यालय अधीक्षक श्री. केशव भोंडवे, प्लेसमेंट सेलचे ऑफिसर डॉ. अनंथा गाडे, प्रोफेसर डॉ. ईश्वर छानवाल, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. विनायक कापावार, प्रा. नागोराव वाघमारे, क्रीडा शिक्षक श्री. राहुल शिनगारे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



---

# शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वतीजींच्या हस्ते श्रीमुर्ती प्राणप्रतिष्ठा

## रुरु संत-महंतांची विशेष उपस्थिती ; काल्याचे कीर्तनाने आज समारोप



**परळी । प्रतिनिधी**

तालुक्यातील श्री क्षेत्र दत्तधाम, सारडगाव येथे सोमवार (दि.२) पासून संत साहित्यिक तथा प्रसिद्ध कथावाचक विद्यावाचस्पती स्वामी डॉ.तुळशीराम गुट्टे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य दिव्य श्री दत्तात्रय भगवान (त्रिमुखी) भव्य प्राणप्रतिष्ठा सोहळा, दत्तयाग व चार दिवसीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात आज गुरुवार दि.५ रोजी बद्रीनाथ येथील परमाराध्य परमधर्माधीश उत्तराम्नाय ज्योतिष्पीठाधीश्वर जगद्गुरु शंकराचार्य स्वामिश्रीः अविमुक्तेश्वरानन्दः सरस्वती १००८ यांची विशेष उपस्थिती लाभणार असून स्वामीजींच्या शुभहस्ते विधिवत महापुजेने श्री दत्तात्रय भगवानजींच्या त्रिमुखी मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना होणार आहे.

प्राणप्रतिष्ठापनेनंतर जगद्गुरु शंकराचार्य स्वामिश्रीः अविमुक्तेश्वरानन्दः सरस्वतीजी यांच्या रसाळ वाणीत भाविकांना अमृततुल्य प्रवचनाचा लाभ घेता येणार आहे. प्रसंगी वेदांत आश्रम बहादुरगड, हरियाणा, हरिद्वार आणि अखिल भारतीय संत समितीचे उपाध्यक्ष प.पू महामंडलेश्वर स्वामी देवेंद्रानंदगिरी महाराज, जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे मा.अध्यक्ष ह.भ.प मारुतीबाबा कुरेकर, प.पू वेदांताचार्य विद्यावाचस्पती डॉ.माणिक शास्त्री मुखेकर तसेच उपस्थित संत महंतांच्या शुभ हस्ते कलशारोहण व महापूजा संपन्न होईल होईल.

या कार्यक्रमास श्रीक्षेत्र भगवानगडाचे महंत ह.भ.प डॉ. नामदेव शास्त्री सानप, कृषिमंत्री मा.धनंजय मुंडे, भाजपच्या राष्ट्रीय सचिव मा.पंकजाताई मुंडे, माईर्स एमआयटी पुणे चे मा.कार्यकारी अध्यक्ष राहुल भैया कराड, खा.भागवतराव कराड, आ.चंद्रकांत सोनवणे, आ.संजय दौंड यांच्यासह मान्यवरांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

मूर्तीप्राणप्रतिष्ठापना, कलशारोहण व महापूजेनंतर लगेचच संत साहित्यिक तथा प्रसिद्ध कथावाचक विद्यावाचस्पती स्वामी डॉ.तुळशीराम गुट्टे महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने या भव्यदिव्य चार दिवसीय कार्यक्रमाचा समारोप होईल.

श्रद्धा, भक्ती, आणि अध्यात्मिक उन्नतीचा महोत्सव असलेल्या या ऐतिहासिक कार्यक्रमास नंदनज, सारडगावसह परळी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अध्यात्मिक चैतन्याची अनुभूती घ्यावी असे आवाहन श्री दत्तात्रय भगवान भव्य प्राणप्रतिष्ठा सोहळा, दत्तयाग व चार दिवसीय भव्य कीर्तन महोत्सव आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

---

## बीड जिल्हा रोल बॉल संघाने राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये पटकावले तृतीय पारितोषिक

**बीड । प्रतिनिधी**

चिपळूण येथे ३० नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०२४ रोजी १४ वी मिनी राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धा महाराष्ट्र राज्य रोल बॉल असोसिएशन व सातारा जिल्हा रोल बॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यातील मुलांच्या संघाने अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत सातारा, धुळे, यवतमाळ, कोल्हापूर संघांचा पराभव करत कांस्यपदक पटकावले.

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस.एस.पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १७३२/२०२४**

**ॲड. एस. बी. शिंदे यांच्या मार्फत**

**किसन माणिक काळे वि. निरंक**

अर्जदार- किसन पि. माणिक काळे, वय - ४८ वर्षे, धंदा - शेती, रा. नेकनूर ता. जि. बीड

गैरअर्जदार - निरंक

प्रकरणः भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत **माणिक पि. रामराव काळे** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत **माणिक पि. रामराव काळे हे दिनांक ०२/११/२०२४ रोजी नेकनूर ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हाच फक्त मयताचा एकमेव कायदेशीर वारस आहे. मयताची पत्नी नामे मोहरबाई भ्र.माणिक काळे हया बऱ्याच वर्षापूर्वी मयत झाल्या आहेत. तसेच मयत माणिक यांचे आई-वडील देखील बऱ्याच वर्षापूर्वी मयत झालेले आहेत. यांच्या शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की. शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे माणिक पि. रामराव काळे या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे माणिक पि. रामराव काळे, रा. नेकनूर ता. जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वानी नोंद घ्यावी.

**पुढील तारीख ०२/०१/२०२५.**

आज दिनांक ०३/१२/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावरून.**

शिक्का

(स्वाक्षरीत) क.लिपीक

(स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

---

## जाहीर प्रगटन

**मा.श्री. ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १७१९/ २०२४**

**ॲड. अभिजीत चौरे यांच्या मार्फत**

**रेखा अशोक खाकरे व ईतर विरूध्द निरंक**

अर्जदार - १. रेखा भ्र. अशोक खाकरे, वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम, २. अशोक पि. पांडुरंग खाकरे, वय ५५ वर्षे, धंदा - शेती, दोघे रा. वाकनाथपुर, ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत **शिवराज पि. अशोक खाकरे**, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत शिवराज पि. अशोक खाकरे, यांचा मृत्यु दिनांक १८/०८/२०२४ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत शिवराज पि. अशोक खाकरे, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत शिवराज पि. अशोक खाकरे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०२/१२/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०७/०१/२०२५ आहे.**

**आदेशावरून.**

शिक्का

(स्वाक्षरीत) क.लिपीक

(स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

---

## जाहीर सुचना

**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांचे कार्यालय**

**शासकीय ईमारत, चांदमारी वसाहत, थानोरा रोड**

**क्रमांक/आस्था-२/एस.आर.१५०/२०२२**

**दिनांक २७/१२/२०२४**

प्रति.- १. संपती रामभाऊ जायभाये, २. हनुमंत रामभाऊ जायभाये, सर्व रा. जायभायेवाडी पो. अंजनडोह ता. धारुर जि.बीड - अपिलदार

विरुध्द

१. रामभाऊ किसन जायभाये, (मयत ) वारस- १.१. इंद्राबाई रामभाऊ जायभाये, १.२. संपती रामभाऊ जायभाये, २.३. हनुमंत रामभाऊ जायभाये, १.४. आश्रवा रामभाऊ जायभाये, १.५. बालासाहेब रामभाऊ जायभाये, १.६. गंगाधर रामभाऊ जायभाये, (मयत) वारस - १.६.२. सुमित्रा गंगाधर जायभाये, १.६.२. रुमा भ्र. रतन सोनवणे, रा. मांजरगाव ता.मांजरगाव जि. नाशिक, १.६.३. कविता भ्र. बाळु केदार, रा. कुटेवाडी ता. पाटोदा जि. बीड, १.६.४. प्रदीप गंगाधर जायभाये, १.६.५. राहुल गंगाधर जायभाये, २. सिताराम बळीराम जायभाये, ३. केशव आश्रवा जायभाये, वरील अ.क्र १ ते ३ रा. जायभायेवाडी पो. अंजनडोह ता.धारूर जि. बीड, ४. आनंत आश्रुबा रेपे, ५. दत्तात्रय आश्रवा रेपे, ६. अंबादास व्यंकटी रेपे, ७. उत्रेश्वर व्यंकटी रेपे, ८. चंद्रकलाबाई मारोती रेपे, ९. भागवत भारत रेपे, अ.पा. क. चंद्रकलाबाई रेपे, १०. सविता अंगद रेपे, १९. सिंधुबाई योगीराज रेपे, १२. चंद्रकलाबाई भारत रेपे, १३. श्रीराम गेना सावंत, १४. सुबराव गेना सावंत, १५. ज्ञानोबा गेना सावंत, १६. वसंत गेना सावंत. १७. आसाराम श्रीहरी सावंत, १८. भागवत श्रीहरी सावंत, १९. वैजनाथ विश्वनाथ रेपे, वरील अ.क्र. ४ ते १९ रा. रेपेवाडी पो. अंजनडोह ता. धारुर जि. बीड २०. उप अधीक्षक भूमि अभिलेख, धारूर - जाबदार

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करण्यात येते की, अर्जदार यांनी गैरअर्जदार यांचेविरुद्ध जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे न्यायालयात मौजे रेपेवाडी ता. धारुर जि. बीड येथील जुना सर्व्हे नंबर ४८ नविन स.नं. ५३ मधील फाळणीवारा पोटहिस्सा मोजणी फेरफार मध्ये कमी झालेले क्षेत्रफळ दुरुस्ती बाबत महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील अर्ज दाखल केलेले आहे.

वरील गेरज अर्जदार यांना जाहीर सुचनेव्दारे कळविण्यात येते की. वरील प्रकरणी दिनांक ०१/०१/२०२५ रोजी वेळ सकाळी / दुपारी ११:३० वाजता जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे कार्यालय, चाँदमारी शासकीय वसाहत, पालवण चौकाजवळ, धानोरा रोड, बीड ता. जि. बीड यांचे समोर सुनावणी आहे. वरील नमुद गैरअर्जदार यांनी नमुद तारखेस न्याय कक्षेत सुनावणीस उपस्थीत रहावे.

वरील नमुद गैरअर्जदार, वरील नमुद तारखेस गैरहजर राहील्यास प्रकरणात एकतर्फी सुनावणी घेण्यात येईल व प्रकरण पुढे चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

शिक्का

स्वाक्षरीत (कृष्णा शिंदे) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड

दैनिक • epaper.marathwadapatra.com

गुरूवार, दि.०५ डिसेंबर २०२४ पान ४

# मराठवाडा पत्र

• dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ Mo. 9822152955

## शेतकऱ्याच्या जमिनीवर बेकायदेशीर ताबा करून सोलार प्रकल्पाचे काम चालू

### धनराज मुंडे यांनी जिवे मारण्याची धमकी दिल्याचे निवेदन

### झालेल्या पिकांचे नुकसान कंपनीने भरून द्यावा अन्यथा आत्मदहन करणार : भरत जाधव व रामभाऊ जाधव





**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरातील येथील शेतकरी भारत विठ्ठल जाधव व रामभाऊ विठ्ठल जाधव यांच्या गट नं. २५९ मधील मालकीच्या जमिनीवर बेकायदेशीर ताबा करून संबंधित सौर कृषी योजने अंतर्गत सोलार पंप प्रकल्पचे काम बंद करा असे शेतकऱ्याने निवेदन दिल्याने तहसीलदार वडवणी यांनी दि. ०६/०९/२०२४ रोजी काम बंद करण्याचे आदेश दिले असतांनाही काम चालू असल्याने गुत्तेदार धनराज राजाभाऊ मुंडे यांना याबाबत विचारणा केली असता त्यांनी माझे राजकीय पुढारी यांच्याशी संबंध आहे असे सांगत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. संबंधित कंपनीने शेतातील माती व मुरूम काढून व मोठं मोठं खड्डे करून शेतीतील पिकाचे अतोनात नुकसान केले आहे. तहसीलदार यांनी दिलेल्या आदेशात जमिनीची मोजणी करून शेतकऱ्याची जमीन न घेता काम करावे व जमिनीची मोजावी असे आदेश दिल्याने भूमी अभिलेख येथील अधिकारी किसन गोरख कवचट यांना मोजणीसाठी अर्ज ▶▶ उर्वरित पान २ वर



**या संबंधी आम्ही संबधीत कंपनीच्या आधिकारी व गुत्तेदार धनराज राजेभाऊ मुंडे यांना विचारणा केली आसता त्यांनी आम्हाला जिवे मारण्याची धमकी दिली व माझे राजकिय पुढरी यांच्याशी संबंध आहेत आसे सांगुन शिवीगाळ केली आणि तुम्हाला काय करायचे ते करा असे सांगीतल, संबंधीत कंपनीने आमच्या शेतात बेकायदेशीर खोदकाम करून आमच्या शेतातील माती व मुरुम हडप केली आहे. व सौर पॅनल बसवण्यासाठी आमच्या संपुर्ण शेतात मोठ मोठे खड्डे खोदले आहेत. तसेच आमच्या शेती पिकांचे आतोनात नुकसान केले आहे. आज दि. ०५/१२/२०२४ भरत विठ्ठल जाधव यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे आत्मदहन करणार असल्याचा इशारा दिला. – भरत विठ्ठल जाधव**

## महाराष्ट्र राज्याच्या सेवेसाठी पुन्हा एकदा आलेल्या बाहुबली देवाभाऊंचे आष्टी मतदारसंघात जयघोषात जोरदार स्वागत, अभिनंदन आणि आनंदोत्सव

# आ.सुरेश धस समर्थकांचा जल्लोष

**आष्टी । प्रतिनिधी**

पाच वर्ष सलग मुख्यमंत्रीपदी राहून विक्रम केलेले देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा येईन असे म्हटले होते परंतु काहींनी केलेल्या गद्दारी करून त्यांना मुख्यमंत्री पदापासून दूर ठेवण्यात आले परंतु मी पुन्हा येईन असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा



निवडणुकीत विरोधकांचा धुव्वा उडवून, संपूर्ण बहुमत मिळवून महायुतीचे सरकार महाराष्ट्र राज्यात स्थापन केले आहे महाराष्ट्र राज्यातील बहिणींचे लाडके भाऊ ठरलेले देवेंद्र फडणवीस पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले आहेत. विधानमंडळ भारतीय जनता पार्टीच्या बैठकीमध्ये सर्वानुमते देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची गटनेता म्हणून निवड

▶▶ उर्वरित पान २ वर

## मत्री पदाचा अनुभव असणाऱ्या आ.प्रकाश दादा सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा : संतोष रासवे

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव मतदारसंघाचा विकास आ.प्रकाश सोळंके यांनीच केला आहे.आणि विकासाचा जो बॅगलॉग राहिला आहे.तो पूर्ण करण्याची धमक ही आ.प्रकाशदादा सोळंके यांचीच आहे.त्यामुळे विकास पुरुष असणाऱ्या व राज्य मंत्रिपदाचा अनुभव असणाऱ्या प्रकाशदादांचा पुन्हा मंत्रिमंडळात समावेश करण्याची मागनी संतोष रासवे यांनी पक्षश्रेटीकडे केली आहे.

माजलगाव मतदार संघात विकासाची मुहूर्तमेढ माजी उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांनी रोवली आहे.तोच आदर्श आ. प्रकाश सोळके यांनी मतदारसंघात सुरू करून विकासाची गंगा या



ठिकाणी ओढून आणली आहे. राज्यमंत्रीपदाच्या आपल्या कार्यकाळात त्यांनी मतदार संघाचा कायापालट केला आहे.मंत्री पदाचा त्यांना अनुभव आहे.मतदारसंघात जो विकास झाला आहे,तो आ. प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली झाला आहे.त्यामुळे नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदार संघातील मतदारांनी आ. प्रकाश सोळंके यांना पाचव्यांदा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली आहे.मागील तीस वर्षांमध्ये आ.प्रकाश सोळंके यांनी मोठ्या प्रमाणात विवीध विकासकामे केली आहेत. विद्यार्थ्यांचे,सुशिक्षित बेरोजगारांचे, त्याचप्रमाणे जलसिंचनाचे,अनेक प्रश्न मार्गी लावल्याने बहुतांशी शेतकरी आज समृध्द झाला आहे. विकासाचे अनेक कामे झाली आहेत.उर्वरित विकासाचा जो बॅकलॉग भरून काढायचा आहे, तोही आ.प्रकाश सोळंकेच काढू शकतात. विकासाची दूरदृष्टी

▶▶ उर्वरित पान २ वर

# विकासकामांच्या वचनपूर्तीसाठी कटिबद्ध राहू: डॉ.योगेश क्षीरसागर

### बीडमध्ये संत सावता महाराज मंदिराच्या संरक्षण भिंतीच्या बांधकामाचे भूमिपूजन

**बीड । प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत आपण विकासाचे व्हिजन मांडले होते. महायुती सरकारच्या माध्यम ातून आपण विकासकामांच्या वचनपूर्तीसाठी कटिबद्ध राहणार आहे, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.

बीडमध्ये संत सावता महाराज



मंदिराच्या संरक्षण भिंतीच्या बांधकामाचे भूमिपूजन बुधवारी (दि.४) करण्यात आले. यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नागरिक नामदेवराव दुधाळ, माजी नगरसेवक बाबूराव दुधाळ, नितीन साखरे, शुभम धूत, बिभीषण लांडगे, मोहनराव गोरे, प्रा.लक्ष्मण गुंजाळ, रमेश दुधाळ, राजेंद्र शेलकर, राजेश साळुंके, गोरख यादव, संतराम पानखेडे, दिलीप बेदरे, मयुर आखाडे, मनोज काळे, निलेश घाडगे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, शहरातील सावता माळी चौक परिसरातील बिंदूसरा नदीकाठेला संत सावता महाराजांचे भव्य मंदिर निर्माण केले जात आहे. या मंदिरासमोरील सभागृहासाठी मी व माजी मंत्री जयदत्तअण्णा क्षीरसागर यांनी यापूर्वी ५० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. याठिकाणी लोकवर्गणीतून ४० लक्ष रुपयांचे मंदिर उभारले

▶▶ उर्वरित पान २ वर

## महादेव बादाडे यांचे निधन



**माजलगाव । प्रतिनिधी**

वाघोरा ता. माजलगाव येथील शेतकरी महादेव रंगराव बादाडे (वय, ६० वर्ष) यांचे मंगळवारी (ता. तीन) रात्री ११ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी (ता. चार) वाघोरा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना नातवंड असा परिवार आहे. सार्वजनीक बांधकाम विभागातील शाखा अभियंता धनंजय बादाडे, मनोज बादाडे यांचे ते वडील होत.

## विलासअप्पा लांडगे, देवीदास उंचे वीरशैवरत्न पुरस्कारने सन्मानित

**माजलगाव । प्रतिनिधी**

परभणी जिल्ह्यातील सोनपेठ येथील श्री नंदीकेश्वर मठ संस्थानचे मठाधिपती श्रीगुरू नंदीकेश्वर शिवाचार्य स्वामीजी यांच्या २४ पट्टाभिषेक वर्धापनदिनाच्या औचित्याने वीरशैव समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कामगिरी करणार्या २४ समाज बांधवांचा वीरशैवरत्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यात माजलगांव येथील श्री. विलासअप्पा लांडगे व छत्रपती संभाजीनगर येथील श्री. देवीदादअप्पा उंचे यांचाही समावेश होता.

सोनपेठ येथील श्री नंदीकेश्वर मठ संस्थानच्या वतीने दरवर्षीच समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कामगिरी करणार्या समाज बांधवांना वीरशैवरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यंदाचे हे तीसरे वर्ष असून,



आतापर्यंत श्री नंदीकेश्व मठ संस्थानच्या वतीने वीरशैव सम ाजातील सुमारे ७० मान्यवरांना वीरशैवरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

शुक्रवार दि.२९ नोव्हेंबर रोजी मठाचे मठाधिपती श्रीगुरू नंदीकेश्वर शिवाचार्य स्वामीजी यांच्या २४ व्या पट्टाभिषेक वधार्पनदिनाच्या अनुषंगाने, त्यांच्या नेतृत्वाखाली सोनपेठ येथे हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या समारोहाला जिंतूर येथील श्रीगुरू अमृतेश्वर शिवाचार्य स्वामीजी, देवणी येथील श्री म.नि.प्र. सिध्दलिंग शिवाचार्य स्वामाजी, आलमल जि.विजापूर येथील श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य

▶▶ उर्वरित पान २ वर

## प्लॅस्टिक मुक्त वडवणी करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ वडवणी यांच्याकडून कापडी पिशवीचे वाटप




**वडवणी । प्रतिनिधी**

आजकाल जागोजागी पसरलेल्या कचऱ्यामध्ये सर्वात मोठ्या प्रमाणावर दिसणारा घटक म्हणजे प्लास्टिक हा आहे प्लास्टिकचा कचरा आरोग्यासाठी खूप घातक आहे त्यामुळे आपण सर्वांनी प्लास्टिक पिशव्यांचा वापर न करता कापडी पेशव्यांचा वापर करावा 'कापडी पिशवी वापरू आरोग्य सांभाळू' हा संदेश देण्यासाठी व प्लास्टिक मुक्त वडवणी करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ वडवणीच्या वतीने मंगळवार दि.०३ डिसेंबर २०२४ रोजी माध्यमिक विद्यालय वडवणी शाळेतील विद्यार्थी व रोटरी क्लब ऑफ वडवणी यांच्या वतीने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते या रॅलीचा वडवणी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून प्रारंभ करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पर्यंत रॅली काढण्यात आली या रॅलीत प्लॅस्टिक वापराचे दुष्परिणाम यावर संदेश व नारे देण्यात आले. आंबेडकर चौक या ठिकाणी रोटरी क्लब ऑफ वडवणी यांच्याकडून कापडी पिशवीचे वाटप करून रॅलीची सांगता करण्यात आली.

प्लास्टिक मुक्त वडवणी करण्यासाठी काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये रोटरी क्लब ऑफ वडवणीचे अध्यक्ष ज्ञानदेव जिजा आंधळे,सचिव भैरवनाथ शिंदे सर, या कार्यक्रमाचे प्रोजेक्टचेअरमन जयदेव लांडे सर,को.चेअरमन संतोष गोंडे सर तसेच रोटरी क्लब ऑफ वडवणीचे माजी तालुकाध्यक्ष डॉ.पूर्भे साहेब,डॉ.मुंडे साहेब,रो. किसन भाऊ माने रो.वशिष्ठ नाना शेंडगे, रो.गोविंद तात्या आंधळे रो. गोरख भाऊ आळणे सर्व रोटेरियन पदाधिकारी उपस्थित होते.

रोटरी क्लब ऑफ वडवणी यांच्या वतीने आयोजित केलेल्या या स्तुत्य उपक्रमाची सर्वत्र चर्चा होत आहे.

# बीडच्या तरूणाईत प्रतिकूल परिस्थितीला अनुकूल करण्याची क्षमता : आदित्य जीवने

### ▸दोन दिवसीय जिल्हा युवा महोत्सवाचे थाटात उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या युवांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. प्रतिकुल परिस्थितीतही ते अनुकुल परिस्थिती निर्माण करू शकतात. या क्षमतेचा, कलागुणांचा युवकांना त्यांच्या जीवनात फायदा होतोच. युवा महोत्सवातून अशा गुणवत्ता, क्षमतेला वाव मिळतो. त्यातूनच उज्ज्वल देश घडण्यासाठी मदत होते, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी केले.

जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा परिषदेचा शिक्षण




विभाग, नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजन यांच्यावतीने आयोजित दोन दिवसीय जिल्हा युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी श्री. जीवने बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रपती पुरस्कारार्थी डॉ.सतीश साळुंखे, शिवछत्रपती पुरस्कारार्थी जे.पी. शेळके, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, जिल्हा युवा अधिकारी अरूणा कोचुरे, प्र. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके, राज्य तायक्वाँदो असोसिएशनचे अध्यक्ष अविनाश बारगजे, राज्य युवक पुरस्कारार्थी तत्वशील कांबळे, ज्येष्ठ क्रीडा संघटक दिनकर थोरात, साने गुरूजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या श्रीमती डॉ. कविता कराड आदींची उपस्थिती होती.

युवा महोत्सवात सहभागी स्पर्धकांच्या कलागुणांना परीक्षकांनी योग्य वाव द्यावा. राष्ट्रीय एकात्मता वृद्धींगत होण्यासाठी युवांमध्ये प्रेरणा निम र्ण करावी, असे आवाहनही श्री. जीवने यांनी यावेळी केले.

जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राचा इतिहास व विकास यावर उपस्थितांना श्री. शेळके, डॉ.साळुंके यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय एकात्मतेचे बीज रूजविण्यासाठी युवा महोत्सव अत्यंत महत्त्वपूर्ण भूमि का बजावत असतात, असेही त्यांनी भाषणातून सांगितले. प्रास्ताविक श्री. विद्यागर यांनी केले. यामध्ये त्यांनी शासनाचा युवा महोत्सवामागील उद्देश आणि दोन दिवसांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धा याबाबत सविस्तर माहिती दिली. सुरूवातीला नटराज मूर्तीचे पूजन, त्यानंतर दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते झाले. साक्षी कराड आणि काव्या डोंगरे यांच्या नृत्य कलेने कार्यक्रमाचा समारोप झाला. आभार श्रीमती कोचुरे यांनी मानले.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून अरूण दैतकार, दीपक जमदाडे, विलास सोनवणे, राम गव्हाणे, डॉ. केशव भागवत, संतोष मस्के, प्रा. श्रीकांत पुरी, राधाकृष्ण वाघ, सुमित गायकवाड, लक्ष्मीकांत दोडके, डॉ. संजय कांबळे, रोहिणी धारमोडे, पूनम वोहरी, संदीप परदेशी, राजेंद्र इंगळे काम पाहणार आहेत. त्यांचाही यावेळी आयोजकांच्यावतीने पुष्पगुच्छ, स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

▶▶ उर्वरित पान २ वर